9 July 2011 पुढारी

# हे शिवाजी राजा... राजतपस्वी वीरा

## एका मंत्रमुग्ध सायंकाळी रंगले डॉ. नरेंद्र जाधव यांचे काव्यवाचन

**नवी दिल्ली : श्रीराम जोशी**

**पूर्व-पश्चिम एक होतील**
**भारत देशाचे, युद्धाशिवाय**
**अन् करतील गौरव, एका पुण्यनामाचा..**
**शिवाजी महाराजांचा विजय असो!**

आपल्या करड्या आवाजात केंद्रीय नियोजन आयोगाचे सदस्य प्रा. डॉ. नरेंद्र जाधव यांनी बंगालच्या पहिल्या शिवाजी उत्सवावर गुरुदेव रवींद्रनाथ टागोर यांनी बंगाली भाषेत लिहिलेल्या काव्याचा स्वतः केलेला मराठी अनुवाद वाचून दाखवला. तेव्हा सरांच्या बाजूला बसलेले दै. 'पुढारी'चे संपादक प्रतापसिंह जाधव आणि व्यवस्थापकीय संपादक योगेश जाधव यांच्यासहित सारा दिवाणखाना वीररसात न्हाऊन निघाला.

आमचा बाप अन् आम्ही... ते... रवींद्रनाथ टागोरांवरील ग्रंथत्रयी अशा या साहित्यप्रवासावर नेताना सरांनी साऱ्यांना मंत्रमुग्ध केले. त्यांच्या साथीला होत्या, त्यांच्या सुविद्य पत्नी श्रीमती वसुंधराताई जाधव!

दिल्लीतल्या रिमझिमत्या पावसाळी सांजेला ताईंच्या हातच्या गरमागरम पोह्यांचा स्वाद आणि वाफाळलेल्या चहाच्या घोटांसोबत सुरू झालेल्या या साहित्यचर्चेच्या सरींवर सरी उसरत राहिल्या अन् रात्र केव्हा उलगडली तेही कुणाला कळले नाही.

लोकमान्य टिळकांनी पुण्यातून सुरू केलेल्या शिवजयंतीची परंपरा बंगदेशी रुजवणारे पहिले मराठी पत्रकार सखाराम गणेश देऊस्कर यांनी कोलकात्यातल्या टाऊन हॉलमध्ये आयोजित केलेल्या शिवजयंतीची रसभरीत कहाणी सर सांगू लागले. त्या कहाणीत पत्रकाराचे जीवन होते, शिवभक्त मराठा होता, नोबेल पुरस्कार प्राप्त करणारे गुरुदेव होते आणि बंगाली समाज-संस्कृती होती. गुरुदेव रवींद्रनाथ टागोर यांनी शिवाजी महाराजांवर कविता लिहिलीय हे कुणाला ठाऊक आहे का, असे विचारत नकारार्थी येणाऱ्या उत्तराची वाटही न पाहता सरांनी रवींद्रनाथांवरील ग्रंथत्रयीतला एक खंड उलगडला. भराभरा पाने चाळली आणि एका पानावर थबकून आपला घसा साफ करीत काव्यवाचनाला प्रारंभ केला.

**हे राजा शिवाजी,**
**कोण जाणे, कधीकाळी मराठ्यांच्या देशी,**
**कडेकपारीतील रानीवनी अंधारात**
**विद्युल्लतेसारखी चमकून गेली तुझ्या मनी प्रतिज्ञा**
**विस्कटलेल्या, विदीर्ण झालेल्या भारत देशाला**
**मी स्वराज्यधर्माच्या सूत्रात जोडून घेईन....**
**त्या दिवशी हा बंगदेश झोपूनच राहिला**
**नाही आला तो बाहेर धावून**
**नव्हता काही संदेश, नव्हता शुभंकर शंखनाद**
**बसले होते शांतमुखे, ग्रामवासी सारे, निवांत स्वस्थ**
**तिकडे मराठ्यांच्या प्रांती, चेतविलेस अग्निकुंड तू**
**अन् कोरून काढलास महामंत्र**
**युगांताच्या क्षितिजावर, विद्युताग्नीने**
**त्या प्रलयंकारी समयी**
**थरारला तुरा मोगलांच्या शिरपेचातला**
**एखाद्या पिकल्या पानाप्रमाणे**
**त्याही दिवशी बंगदेशाने नाही रे ऐकला**
**विजेच्या लखलखाटातला तो संदेश....**

शिवाजी महाराजांवरील या कवनाच्या माध्यमातून गुरुदेवांनी घेतलेल्या स्वातंत्र्यलढ्यातल्या बंगालच्या समाजरीती अन् लोकभातींचा आढावा आणि व्यक्त केलेले हृदय पिळवटणारे दुःख सरांनी आपल्या शब्दप्रतिभेतून आणि मुखवाणीतून असे काही साकारले, जणू प्रत्यक्ष गुरुदेवच आपली मनोव्यथा व्यक्त करीत आहेत.

**हे शिवाजी राजा, हे वीर मराठ्या**
**कोठे होतास रे तेव्हा? कुठे होता तुझा भगवा झेंडा?**
**विदेशी लोकांनी लिहिलेला इतिहास**
**करितो तुझा उपहास**
**तुला दरोडेखोर संबोधून हसतो खदाखदा**
**तुझी प्रयत्नांची पराकाष्ठा म्हणजे**
**लुटारूंची निष्फळ धडपड होती**
**असंच वाटत आलंय सर्वांना...**

या ओळी सादर करताना सर क्षणभर थबकले. त्यांनी आपली नजर सभोवार साऱ्यांवर फिरवली. भुवया उंचावल्या. त्या उंचावण्यात एक सूचक प्रश्न होता. आजच्या काळाच्या जेम्स लेनचा मौनसंदर्भ होता. पण पुढच्याच ओळीत खुद्द गुरुदेवांनीच दिलेले सडेतोड उत्तर होते... दिवाणखान्यात बसलेल्यांनाच काय पण समाजातल्या, देशातल्या अन् विदेशातल्या साऱ्यांना सुखावणाऱ्या त्या ओळी होत्या-

**हे शिवाजी राजा, राजतपस्वी वीरा**
**तुझी ती उदात्त भावना**
**विधात्याच्या भांडारात जतन करण्यात आली आहे**
**काळाला त्याचा एखादा कण तरी नष्ट करता येईल का?**



नवी दिल्ली : नियोजन आयोगाचे सदस्य डॉ. नरेंद्र जाधव यांनी रवींद्रनाथ टागोर यांच्या शिवरायांवरील बंगाली कवितेचा मराठी अनुवाद 'पुढारी'चे संपादक प्रतापसिंह जाधव यांच्यासमोर सादर केला.

सकाळ पुणे शहर

पुणे, रविवार, ३१ जुलै २०११

# लोकसभेची निवडणूक पुण्यातूनच लढणार

## केंद्रीय नियोजन आयोगाचे सदस्य डॉ. नरेंद्र जाधव यांचे प्रतिपादन; नानाविध कारणांमुळे पुण्याला विसरणे अशक्य

सकाळ वृत्तसेवा

पुणे, ता. ३० : "पुण्याने आजवर मला जे प्रेम दिले, ते मी कधीही विसरू शकणार नाही. उद्या राजकारणाच्या क्षेत्रात आलोच, तर लोकसभेची निवडणूक मी फक्त पुण्यातूनच लढणार," अशा शब्दांत सरकारच्या केंद्रीय नियोजन आयोगाचे सदस्य डॉ. नरेंद्र जाधव यांनी आपली पुढील वाटचाल प्रथमच जाहीरपणे सांगितली.

फ्रेंच सरकारचा 'कमांडर ऑफ ॲकॅडमिक पाम्स' हा सर्वोच्च नागरी सन्मान नुकताच डॉ. जाधव यांना प्रदान करण्यात आला. या निमित्ताने भोई प्रतिष्ठानतर्फे आयोजित सोहळ्यात महापौर मोहनसिंग राजपाल आणि संत साहित्याचे अभ्यासक डॉ. रामचंद्र देखणे यांच्या हस्ते डॉ. जाधव यांचा सत्कार करण्यात आला. त्या वेळी त्यांनी आपली भावना व्यक्त केली.

'देशाला वैचारिक नेतृत्व देण्याची शक्ती महाराष्ट्रात आणि तीही पुण्यात सर्वांत जास्त आहे. आपण सर्व जण पुण्यावर कोटया करतो, वेगवेगळे विनोद करतो आणि मनापासून प्रेमही करतो. कमीत कमी शब्दांत जास्तीत जास्त अपमान करणे किंवा कौतुक करणे, हेही केवळ पुण्यातच होऊ शकते. अशा नानाविध कारणांमुळे पुण्याला विसरणे अशक्य आहे. कुलगुरू असताना मी दररोज जाहीर कार्यक्रमांना उपस्थित राहत असे. त्यामुळे 'विद्यापीठाची कामे केव्हा करता,' असा प्रश्नही काहींनी उपस्थित केला. पण त्या वेळी मी विद्यापीठ आणि समाज यांना जोडण्याचे काम करत होतो," असे डॉ. जाधव यांनी सांगितले.

बाराव्या वित्त योजनेची सुरवात झाली असून, त्या संदर्भातील समितीसाठी मी महाराष्ट्रातून तब्बल ८५ जणांची निवड केली आहे, असेही डॉ. जाधव यांनी या वेळी सांगितले. या प्रसंगी माजी क्रिकेटपटू चंदू बोर्डे, निवृत्त एअर व्हाइस मार्शल भूषण गोखले, पोलिस उपायुक्त ज्ञानेश्वर फडतरे, स्थायी समितीचे अध्यक्ष गणेश बिडकर, प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. मिलिंद भोई उपस्थित होते.

### सचिनसारखी इनिंग

"तुमची आजवरची वाटचाल मी पाहिली. क्रिकेटच्या भाषेत या वाटचालीबाबत बोलायचे झाले, तर तुमची 'इनिंग' सचिनसारखी आहे, असे मला सांगावेसे वाटते," अशा शब्दांत चंदू बोर्डे यांनी डॉ. जाधव यांचे कौतुक केले.




**इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअर्स सभागृह :** भोई प्रतिष्ठानतर्फे डॉ. नरेंद्र जाधव यांचा महापौर मोहनसिंग राजपाल आणि डॉ. रामचंद्र देखणे यांच्या हस्ते शनिवारी सत्कार करण्यात आला. सोबत मिलिंद भोई.

दै. पुढारी ३१/७/११.



भोई प्रतिष्ठानच्या वतीने नियोजन आयोगाचे सदस्य आणि जगप्रसिद्ध अर्थतज्ज्ञ डॉ. नरेंद्र जाधव यांचा डॉ. रामचंद्र देखणे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी डावीकडून क्रिकेटपटू चंदू बोर्डे, मोहनसिंग राजपाल, स्थायी समितीचे अध्यक्ष गणेश बिडकर, डॉ. जाधव, डॉ. देखणे, डॉ. मिलिंद भोई आणि भूषण गोखले.

# ...तर लोकसभेची निवडणूक पुण्यातूनच लढवेन : डॉ. जाधव

**पुणे : प्रतिनिधी**

जर कधी मी राजकारणात पडलो तर लोकसभेची निवडणूक पुण्यातूनच लढवेन, असे नियोजन आयोगाचे सदस्य आणि जगप्रसिद्ध अर्थतज्ज्ञ डॉ. नरेंद्र जाधव यांनी शनिवारी येथे एका कार्यक्रमात जाहीर केले.

डॉ. जाधव यांना फ्रेंच सरकारने 'कमांडर ऑफ अ‍ॅकॅडेमिक पाम्स' हा तेथील सर्वोच्च नागरी पुरस्कार प्रदान केला आहे. यानिमित्त भोई प्रतिष्ठानतर्फे त्यांचा संत साहित्याचे अभ्यासक डॉ. रामचंद्र देखणे यांच्या हस्ते जगद्गुरू संत तुकाराममहाराज यांची पगडी आणि गौतम बुद्धांची प्रतिमा देऊन सत्कार करण्यात आला. त्याप्रसंगी सत्काराला उत्तर देताना डॉ. जाधव बोलत होते.

ते म्हणाले, पुणे विद्यापीठाच्या कुलगुरूपदावर काम करत असताना पुणेकरांकडून सर्वाधिक प्रेम मिळाले. सुरुवातीला काहींनी पान ११ वर→

...तर लोकसभेची निवडणूक पुण्यातूनच लढवेन : डॉ. जाधव

पत्र लिहून या पदाचे नीट काम करण्याचा सल्लाही दिला, मात्र माझी काम करण्याची पद्धत माहिती झाल्यानंतर त्याच लोकांची चांगली पत्रेही आली. त्यावेळी काही पुणेकरांनी मला स्वीकार केल्याचेही कळविले असून मी पुण्याचा झालो आहे, त्यामुळे राजकारणात पडलो तर लोकसभेसाठी पुणे हाच मतदारसंघ असेल, असे जाधव म्हणाले. पुणे विद्यापीठाच्या कुलगुरू पदाचा कार्यभार स्वीकारल्यानंतर येथे विद्यापीठ आणि समाजात दरी निर्माण झाल्याचे दिसून आले. त्याची सांगड घालण्यासाठी शहरातील विविध कार्यक्रमांना हजर रहायचो, त्याबाबत प्रसिद्धीही मिळे. ती वाचून अनेकांना मी विद्यापीठाचे कामकाज व्यवस्थित करेन की नाही, याबाबत शंका निर्माण झाल्या. अशा पुणेकरांनी मला पत्र लिहून नीट काम करण्याचा सल्ला दिला. मात्र, माझा उद्देश ध्यानात आल्यानंतर त्याच पुणेकरांनी माफीही मागितली. त्यामुळे मला पुणेकरांनी स्वीकारले आहे, असे समजून भविष्यात राजकारणात पडलो तर येथूनच लोकसभेची निवडणूक लढवेन. सध्या बाराव्या नियोजन आयोगाची सुरुवात झाली आहे. महाराष्ट्र हे देशाला वैचारिक नेतृत्व देणारे राज्य आहे. यामध्ये पुण्याची शक्ती सर्वाधिक आहे, हे दाखवून संपूर्ण देशाला दाखवून द्यायचे असल्याने या आयोगात येथील ८५ लोकांचा समावेश केला आहे. त्यांची विविध समित्यांमध्ये नियुक्ती केली असून ते समाधानकारक काम करत असल्याचेही डॉ. जाधव यांनी सांगितले.

प्राचीन काळात वेदाइतकाच अर्थशास्त्राही महत्त्वाचे होते. सर्व वेदांत अर्थशास्त्र प्रधान होता. अर्थशास्त्रज्ञांचा भारताला वारसा मिळाला आहे. त्यामध्ये डॉ. नरेंद्र जाधव यांचा सहभाग आहे. ते एवढ्या मोठ्या पदावर जाऊनही त्यांना जाणिवांचा विसर पडला नाही. सामान्य माणसाला केंद्रबिंदू मानून त्यांनी काम सुरू केले. सध्या संस्कृतीत विघटनता येत आहे. त्यामध्ये डॉ. जाधव यांनी सामंजस्य निर्माण केला आहे, असे डॉ. रामचंद्र देखणे यांनी सांगितले. प्रास्ताविक डॉ. मिलिंद भोई यांनी केले. सूत्रसंचालन माधुरी कुलकर्णी यांनी तर अ‍ॅड. प्रताप परदेशी यांनी आभार मानले.

महापौर मोहनसिंग राजपाल, स्थायी समितीचे अध्यक्ष गणेश बिडकर, निवृत्त एअर व्हाईस मार्शल भूषण गोखले, प्रसिद्ध क्रिकेटपटू चंदू बोर्डे, पोलिस उपायुक्त ज्ञानेश्वर फडतरे, प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. मिलिंद भोई यावेळी व्यासपीठावर उपस्थित होते.

संमिश्र २ पुढारी | पुणे, शनिवार १६ जुलै २०११

# नरेंद्र जाधव यांना 'कमांडर ऑफ दी अॅकॅडमिक पाल्म्स' पुरस्कार

**नवी दिल्ली : टेकचंद सोनवणे**

जागतिक कीर्तीचे अर्थतज्ज्ञ व केंद्रीय नियोजन आयोगाचे सदस्य डॉ. नरेंद्र जाधव यांची नवी ओळख कमांडर नरेंद्र जाधव अशी असणार आहे. राष्ट्रीय सल्लागार परिषदेचे सदस्य असलेल्या डॉ. नरेंद्र जाधव यांना फ्रान्सच्या स्वातंत्र्यदिनानिमित्त 'कमांडर ऑफ दी अॅकॅडमिक पाल्म्स' या पुरस्काराने गुरुवारी नवी दिल्ली येथे झालेल्या कार्यक्रमात गौरविण्यात आले.

यावेळी सौ. वसुंधरा जाधव, दिनेश जाधव, विकास सूर्यवंशी, किशोर रक्ताटे यांच्यासह फ्रान्स दूतावासातील उच्चपदस्थ अधिकारी उपस्थित होते. विख्यात सेनापती नेपोलियन बोनापार्ट यांनी १८०८ मध्ये फ्रान्सच्या स्वातंत्र्यदिनी या पुरस्काराची सुरुवात केली. सामाजिक समतेच्या स्थापनेसाठी कार्य करणाऱ्या विचारवंतांना हा पुरस्कार दिला जातो. हा पुरस्कार प्राप्त करणारे डॉ. जाधव हे पहिले भारतीय ठरले आहेत.

फ्रान्सच्या दूतावासात झालेल्या कार्यक्रमात डॉ. जाधव यांना फ्रान्सचे भारतातील राजदूत जेरॉम बोनाफॉट यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. बोनाफॉट म्हणाले की, डॉ. जाधव यांच्या बहुविध योगदानासाठी त्यांना सन्मानित करण्यात येत आहे. डॉ. जाधव सत्काराला उत्तर देताना म्हणाले की, सामाजिक, सांस्कृतिक राजकीय क्षेत्रात स्वातंत्र्य, समता व बंधूता या तत्त्वांचा प्रसार होण्यासाठी कार्यरत असणाऱ्यांचा हा गौरव आहे.